# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - संगीतस्पर्श
- कवी / कवयित्रीचे नाव :- शंतनू कुलकर्णी

---

उमलू पाहणाऱ्या कळ्यांना
फुलपाखरांचा स्पर्श व्हावा
तनाला, मनाला, जीवनाला
तसाच संगीत स्पर्श व्हावा

तप्त उन्हात कोमेजलेल्या
रोपट्यांना जलस्पर्श व्हावा
आनंदातुर अस्तित्वांना
तसाच संगीत स्पर्श व्हावा

कंटाळलेल्या स्तब्ध पानांना
हळुवार झुळूकस्पर्श व्हावा
चैतन्यातुर सचेतनांना
तसाच संगीत स्पर्श व्हावा

लोखंडाचे करेल सोने
तो परिसाचा स्पर्श व्हावा
रूक्ष, उदास व्यक्तित्वांना
तसाच संगीत स्पर्श व्हावा

Anahat Music Therapy